**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ११४६/२०२०**

**अपिलार्थी, श्री. कैलास मदनराव घोळसे,**
रा. खेडकर लेआऊट, वार्ड क्र. ८, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर

**-विरुध्द-**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. कर निरीक्षक,**
नगर परिषद कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२२**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०१.२०२० | १७.०२.२०२० | १७.०२.२०२० | १८.०३.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १६.०१.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " घराचा घर क्र. ००७८ हा असून सन २०१५-२०१६ मध्ये माझ्या वडीलांनी घरामधील अर्धा भाग (अर्धे घर) व अर्ध्या घरामध्ये फक्त एक रुम जास्त आहे आणि होती. मग त्या अर्ध्या घराचा घर क्र. ००७८/१ हा झाला असून असे दोन वेगवेगळे घर क्र. झाल्यावर सुध्दा घरावरील सन २०१५-२०१६ पासून कर कमी झाले नाही. परंतु वाढत गेली, असे कर वाढले कसे?" असे नमुद करुन सविस्तर माहितीची मागणी केल्याचे दिसून येते. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस मागितलेली माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १७.०२.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे “ माहिती दिली नाही” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १८.०३.२०२० रोजी सुनावणी घेवून “ जन माहिती अधिकारी यांनी प्रथम माहिती अर्जात अपेक्षीत केलेली माहिती उदा. ठरावाची प्रत, नगररचना विभागाचे दर इत्यादी माहिती अपीलकर्त्यास निशुल्क देण्यात यावी. दुसऱ्या माहिती अधिकार अर्जातील माहितीचे स्वरुप हे प्रश्नार्थक असल्याने देता येणे शक्य नाही. तिसरा माहिती अधिकार अर्जावर महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी

अधिनियम, १९६५ चे कलम १०५ ची प्रत निशुल्क देण्यात यावी. तसेच चौथा माहिती अधिकार अर्जानुसार मागितलेली माहिती प्रश्नार्थक असली तरी कार्यालयाच्या बांधिलकी म्हणून उपलब्ध असल्यास सन १९९२-९३ पासून असिस्मेंटची प्रत देण्यात यावी. याकरीता सदरील कालावधीतील अभिलेख कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अभिलेख बघण्याची मुभा राहील." असे नमुद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २३.०७.२०२० रोजी** "चुकीची माहिती पुरविल्यामुळे" असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १६.०६.२०२२ रोजी आयोगात सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. कर निरीक्षक, श्री. सचिन पडलवार व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्रीमती हर्षता राणे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलकर्ता अनुपस्थित असल्याने अधिक शहानिशा होवू शकली नाही. मात्र, उपलब्ध कागदपत्रे तसेच झालेला युक्तीवाद लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार ठरावाची प्रत, नगररचना विभागाचे दर इत्यादी निशुल्क माहिती अपीलार्थीस प्रदान करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायती व औद्योगिक अधिनियम, १९६५ नुसार कलम १०५ ची प्रत, त्याचबरोबर सन १९९२-९३ ची असेसमेंट ची प्रत अपीलार्थीस निशुल्क प्रदान करण्यात आली आहे.

वरील बाब लक्षात घेता, सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाचे पालन झाल्याचे आढळून येते. आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जोडपत्र-अ नुसार उपलब्ध करुन देण्यात आलेले कागदपत्रे आयोगासमक्ष सादर केले आहे. नगरपरिषद क्षेत्रात राहत असलेल्या व वाढीव मालमत्ता कर नागरिकासंबंधीत कायदयाअंतर्गत नगररचना विभाग यांच्याविरुध्द प्रथम अपील अर्ज, द्वितीय अपील अर्ज विभागीय अधिकारी यांच्याकडे कायदेशिररित्या सादर करणे शक्य आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील अर्ज व द्वितीय अपील अर्ज याआधीच दाखल केले असून वाढीव कर फेटाळण्यात आला आहे. अपीलकर्ता यांनी सादर केलेल्या माहिती अर्जानुसार त्यांनी मागितलेली कागदपत्रे त्यांना या आधीच प्रदान करण्यात आली आहे. अपीलकर्ता यांचा मुख्य आक्षेप वाढीव कर कमी करण्याबाबत आहे. त्यानुसार विहीत कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केला असल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १६.०६.२०२२**

जावक क्रमांक 4658 दिनांक 27 JUL 2022

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

Appeal/k-J/appeal no. 1046/2020